**स्थायी निदेश क्र. १२**

**नगरपरिषदांमार्फत पुरविल्या जाणा-या सेवा आर्थिकदृष्टया तुटीत असल्याने इतर तुट भरुन काढल्याचा अहवाल वार्षिक अर्थसंकल्पा सोबत सादर करणे - परिगणनाची पध्दती**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय.**
**गृहनिर्माण भवन (म्हाडा) तळमजला,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.**
**क्र.१२ संकीर्ण-२००१/प्र.क्र. २४६/२००१/४**
**दिनांक १० एप्रिल २००१.**

संदर्भ - १) या संचालनालयाचे स्थायी निदेश क्र. ०९ दिनांक १५ एप्रिल, २००१.

या संचालनालयाच्यावतीने वरील संदर्भ क्रमांक १ येथे नमूद केलेले स्थायी निदेश क्र. ०९ दिनांक १५ जानेवारी २००१ अन्वये नगरपरिषदांनी अर्थसंकल्पासोबत महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०१ (१ अ) च्या तरतुदीनुसार अहवाल सादर करण्याबाबत स्थायी निदेश दिलेले आहेत.

०२. या संचालनालयाच्या असे निर्देशनास आले आहे की, अधिनियमातील तरतुदीनुसार वरील अहवाल तयार करताना वेगवेगळया सेवांवर नगरपरिषदेकडून मागील वर्षी किती खर्च करण्यात आला आणि त्या त्या सेवांपासुन किती उत्पन्न प्राप्त झाले याची परिगणना करण्याबद्दल संदिग्धता आहे. तूट भरुन काढण्याचा अहवाल तयार करता यावा आणि या संदर्भात कोणत्याही बाबींबद्दल संदिग्धता राहून नये यासाठी (यापुढे वेळोवेळी होणा-या सुधारणेस अधीन राहून) खालीलप्रमाणे स्थायी निदेश देण्यात येत आहे.

०३. अधिनियमाच्या कलम १०१ (१ अ) नुसार,

१) पाणी पुरवठा व जलनि:सारण
२) गटारे साफ करणे व घनकचऱ्याची वाहतूक व विल्हेवाट
३) नगरपरिषद परिवहन सेवा (ही सेवा नगरपरिषदेमार्फत दिली जात असल्यास), आणि
४) रस्त्यांवरील दिवाबत्ती

याबाबीबद्दल मागील आर्थिक वर्षाकरिता अहवाल पुढील वर्षाचा अर्थसंकल्प सादर करताना सोबत जोडून सादर करणे अपेक्षित आहे.

०४. नगरपरिषदांमार्फत पुरविल्या जाणाऱ्या वरील प्रत्येक सेवेकरिता होणारा खर्च आणि त्या त्या सेवेबाबत सेवा शुल्क म्हणून मिळणारे उत्पन्न विचारात घेतले जावे. अधिनियमातील कलम १०५ अन्वये नागरी भागात असलेल्या मालमत्तांवर एकत्रित कर आकारला जातो. या मालमत्ता करामध्ये खालील ७ बाबीचा समावेश आहे

१) सर्वसाधारण सेवा कर
२) सर्वसासधारण पाणीपट्टी
३) दिवाबत्ती कर
४) सर्वसाधारण स्वच्छता विषयक कर
५) विशेष स्वच्छता कर,
६) अग्नि कर
७) पर्यावरण कर

अ) पाणी पुरवठा व जलनि:सारण सेवेबद्दल तूट भरुन काढण्याचा अहवाल

०५. पाणी पुरवठयाची सेवा नागरीकांना देत असतांना उत्पन्न म्हणून खालील तीन बाबी विचारात घ्याव्यात व एकूण उत्पन्न परिगणित करावे

१) एकत्रित मालमत्ता करापासून वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी १५% भाग.

२) विशेष पाणीपट्टी व्दारे वर्षभरात झालेली वसूली

३) नवीन नळ कनेक्शन देताना वसूल झालेले शुल्क

०६. पाणी पुरवठा सेवेवर झालेला खर्च काढताना खालील बाबी विचारात घ्याव्यात

१) पाणी पुरवठयाच्या कामकाजाशी संबंधित असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचा पगार, निवृत्तीवेतन, सेवानिवृत्तीनंतर त्यांना देण्यात येणारे अंशदान, रजा रोखीकरण लागू असल्यास देण्यात येणारे अन्य फायदे

२) पाणी पुरवठा योजनेच्या डागडूजी व दुरुस्तीवर झालेला खर्च.

३) पाणी पुरवठयामध्ये वापरण्यात आलेल्या रसायने, तुरटी, टी.सी.एल. पावडर इत्यादीवरील खरेदीचा खर्च.

४) पाणी पुरवठा योजनेसाठी वापरण्यात आलेल्या वीज बीलांपोटी झालेला खर्च

५) पाण्याची ठोक खरेदी झालेली असल्यास, त्यावर झालेला खर्च.

६) शहरातील सार्वजनिक कोंडाळी यासाठी विद्युत देखभाल व दुरुस्तीवर झालेला खर्च.

७) या योजनेच्या कामासाठी कर्ज घेतले असल्यास, त्या कर्जाच्या परतफेडीसाठी त्या वर्षामध्ये नगरपरिषदेवर पडलेला आर्थिक भार,

८) पाणी पुरवठा योजनेच्या सर्व उपंगांकरिता वार्षिक घसारा निधी

वरील १ ते ८ बाबींवर झालेला एकूण खर्च या सेवेवर झालेला खर्च समजण्यात यावा.

०७. ज्या नगरपरिषदा भुयार गटाराद्वारे मलनि:सारणाची सेवा उपलब्ध करुन देतात त्या नगरपरिषदांनी विशेष मलनिस्सारण कराद्वारे मिळालेली वसूली उत्पन्न म्हणूनच विचारात घ्यावे आणि खर्चाची परिगणना करताना भुयारी मलनिस्सारणाच्या सेवेसाठी सर्व बाबींवर झालेला खर्च वरील पध्दतीनुसारच विचारात घ्यावा आणि त्यानुसार परिगणना करावी.

ब) दिवाबत्ती सेवेबद्दल तुट भरुन काढण्याचा अहवाल

०८. सार्वजनिक दिवाबत्तीची सेवा शहरामध्ये उपलब्ध करुन देताना नगरपरिषदेचे उत्पन्न म्हणून स्वतंत्ररित्या सेवा शुल्क सर्वसाधारणपणे वसूल केला जात नाही, म्हणून या सेवेवर प्राप्त झालेले उत्पन्न काढताना आर्थिक वर्षात वसूल झालेल्या मालमत्ता कराच्या रकमेच्या १५% भाग या सेवेसाठी मिळालेले उत्पन्न समजण्यात यावे.

१) दिवाबत्तीची सोय उपलब्ध करुन देण्यासाठी झालेल्या खर्चाची परिगनणा करताना या कामावर असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचा पगार, निवृत्तीवेतन, सेवानिवृत्तीनंतर त्यांना देण्यात येणारे अंशदान, रजा रोखीकरण लागू असल्यास देण्यात येणारे अंशदान, रजा रोखीकरण लागू असल्यास देण्यात येणारे अन्य फायदे इत्यादींवर सर्व प्रकारचा खर्च,

२) नवीन कामे, बल्ब, टयूब, वायरिंग, देखभाल व दुरुस्तीवर झालेला खर्च, आणि

३) दिवाबत्ती करिता बीज मंडळास द्यावी लागणारी रक्कम.

वरील १ ते ३ बाबींवरील झालेला एकूण खर्च या सेवेसाठी झालेला खर्च समजण्यात यावा, आणि त्याप्रमाणे तुटीची अगर शिलकीची परिगणना करावी.

क) सर्वसाधारण स्वच्छता विषयक सेवेकरिता तूट भरुन काढण्याचा अहवाल

०९. सर्वसाधारण स्वच्छता सेवा म्हणजेच घनकचऱ्याचे व्यवस्थापन व गटार साफ करण्याची सेवा नगरपरिषदे मार्फत पुरविली जाते. या सेवेकरिता मिळालेल्या उत्पन्नाची परिगणना करताना वसूल झालेल्या मालमत्ता करापैकी १५% भाग साफसफाई या सेवेसाठी मिळालेले उत्पन्न समजण्यात यावे.

१) या सेवेसाठी झालेला खर्च काढताना स्वच्छता विषयक कामासाठी असलेल्या सर्व कर्मचा-यांवर आस्थापना विषयक बाबींवर झालेला खर्च.

२) साफसफाई कामासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर झालेला खर्च,

३) साफसफाई कामासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांकरिता घसारा निधीचा वार्षिक भाग

४) फवारणीसाठी खरेदी केलेली जंतुनाशके इत्यांदीवर झालेला खर्च.

वरील १ ते ४ बाबींवरील झालेला एकूण खर्च या सेवांवर झालेला खर्च समजण्यात यावा.

**ड) सार्वजनिक परिवहन सेवा अनुदान अहवाल**

१०. या सेवेपासून मिळणारे उत्पन्न म्हणजेच प्रवाशांकडून वसूल झालेले भाडे. या सेवेसाठी झालेल्या खर्चाची परिगणना करताना

१) या कामावर असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे आस्थापना विषयक सर्व बाबींवर झालेला खर्च.

२) वाहनांकरिता लागणारी यंत्रसामुग्री

३) वाहनांची देखभाल व दुरुस्ती

४) नवीन वाहने खरेदी केली असल्यास त्यावर झालेला खर्च

५) वाहनांच्या विमा इत्यादीवर खर्च

६) वाहनाकरीता घसारा निधीचा वार्षिक भाग

या १ ते ६ बाबींवरील झालेला एकूण खर्च या सेवेवर झालेला खर्च समजण्यात यावा.

११. वरील प्रमाणे सेवा पुरविताना प्रत्येक सेवेपासून मिळालेले उत्पन्न आणि प्रत्येक सेवेवर झालेला एकत्रित खर्च विचारात घेऊन यापैकी कोणकोणत्या सेवा पुरविताना तूट आली किंवा शिलकी राहिली याची परिगणना करावी. ज्या सेवा पुरविण्याबाबत वर्ष अखेरीस शिलकी राहिली असेल तर त्याबाबत तसा स्पष्ट उल्लेख करावा. मात्र तूट राहिली असल्यास प्रत्येक सेवेसंबंधीच्या त्रुटी बद्दल सविस्तर विवरण अहवालात नमूद करावा.

१२. नगरपरिषदेकडून वरील चार प्रकारच्या या सेवा तूटीच्या अवस्थेत पुरविल्या गेल्यास म्हणजेच मिळालेल्या उत्पन्नापेक्षा खर्च अधिक प्रमाणात झाला असल्यास त्या तुटीचे प्रमाण नमुद केले जावे व ती तूट भरुन काढण्यासाठी नगरपरिषदेच्या इतर कोणत्या उत्पन्नातून सदर तूट भरुन काढण्यात आली याचा उल्लेख करावा. त्या शिवाय प्रत्येक सेवेचा लाभ शहरातील कोणकोणत्या वर्गातील लोकांना किंवा घटकांना किती प्रमाणात देण्यात आला आहे याची परिगणना करावी. उदा. पाणीपुरवठा सेवा देताना काही विशिष्ठ घटकांकरिता विशेष पाणीपट्टी कमी दराने लावली गेली असल्यास किंवा सार्वजनिक कोंडाळी असल्यास त्यावरुन कोणालाही विशेष पाणीपट्टी कर आकारणी करण्यात आली नसेल, तर अशा कोणत्या घटकांस किती प्रमाणात इतर नागरीकांपेक्षा अनुदानित सेवा देण्यात आली आहे याचा स्पष्टपणे उल्लेख करावा.

१३. मुख्याधिकारी यांनी उपरोक्त सूचना विचारात घेवून स्थायी निदेश क्रमांक ०९ नुसार कार्यवाही करावी आणि अशा प्रकारे सादर केलेल्या अहवालाची प्रत दरवर्षी ३१ जुलै पूर्वी आपल्या कडील वार्षिक लेख्यासोबत संचालनालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

(भगवान सहाय)
संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय.